झोल्टन पाल डाईन हे एक हंगेरीयन गणित तज्ञ आणि प्रसिद्ध शिक्षण तज्ञ होते. त्यांनी डाईन ब्लॉक कृती विकसित केल्या आहेत. हे ब्लॉक संख्येमधील अंकांचे स्थानमूल्य दर्शवितात आणि विद्यार्थ्यांना 10 च्या आधारांकाची भारतीय स्थानमूल्य पध्दती समजून घेण्यास सहाय्य करतात, तसेच संख्येवरील मूलभूत क्रिया करावयासही डाईन ब्लॉक्स सहाय्यभूत आहेत.



© NCERT NOT TO BE REPUBLISHED

सहस्त्राची विभागणी करूया



a) आपण 900 वर आहोत. तर 1000 होण्यासाठी अजून किती हवेत? .....

900 + ... = 1000

b) 800 वर एक खूण करा. तिथून पूढे 1000 होण्यासाठी अजून किती हवेत? .....

800 + ... = 1000

c) 850 वर एक खूण करा तिथून पुढे 1000 होण्यासाठी अजून किती हवेत ? .....

850 + ... = 1000


d) 760 वर एक खूण करा. तिथून पुढे 1000 होण्यासाठी अजून किती हवेत? .....


760 + ... = 1000

e) 400 वर एक खूण करा. 400 हे 1000 पेक्षा कितीने कमी आहेत.

1000 – ..... = 400

f) खालील चित्रामधील उदाहरणांमध्ये बेरीज 1000 होईल अशी संख्या भरून पूर्ण करा.






NOT TO BE REPUBLISHED @KTBS

गट आणि पूनर्गट करणे


खालील चित्रे पहा. त्यामध्ये जास्तीत जास्त 10 एकक किंवा 10 दशकांना गोलकरून त्यांचे गट करा. त्यानंतर त्या चित्राद्वारे दर्शविलेली संख्या लिहा.



30 + 4 = 34

3 दशक + 4 एकक

= 34




एकक, दशक, व शतक दर्शविताना संख्येच्या उजवीकडून डावीकडे अनुक्रमे अंक दर्शवावेत.

200+50 = 250

2 शतक + 5 दशक + 0 एकक

= 250



_____ + _____= ____

____ दशक + ____ एकक = _____

_____ + _____= ____


_____ शतक + _____ दशक +

_____ एकक = _____

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

खालील चित्रांमध्ये आवश्यकतेनुसार दहा 1 एकक, 10 दशक, आणि 100 शतक यांना गोल करून गट करा. रिकाम्या चौकटी भरा.

a)




14 एकक

1 दशक + 4 एकक = 14

दशक	एकक
1	4
14	

b)




23 एकक

____ दशक + ____ एकक = _____

दशक	एकक

c)




1 दशक व 27 एकक

____ दशक + ____ एकक = _____

दशक	एकक

d)




10 दशक आणि 6 एकक

1 शतक + 0 दशक + 6 एकक = 106

शतक	दशक	एकक
1	0	6
1 0 6		


@KTBS NOT TO BE REPUBLISHED

e)



11 दशक आणि 14 एकक

f)



1 शतक, 12 दशक आणि 14 एकक

_____ शतक + _____ दशक +

_____ एकक = _____

_____ शतक + _____ दशक +

_____ एकक = _____


शतक	दशक	एकक

शतक	दशक	एकक

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

चला सोडवू

खालील प्रत्येक बाबतीत येणारी संख्या ओळखा व तुमच्या वहीत लिहा. आवश्यकता असल्यास अशी चित्रे काढा



a) 45 एकक

b) 39 एकक

c) 35 दशक

d) 86 दशक

e) 10 दशक आणि 1 एकक

f) 15 दशक आणि 23 एकक


g) 34 दशक आणि 12 एकक

h) 19 दशक आणि 10 एकक


i) 2 शतक, 13 दशक आणि 7 एकक

1000 (एक सहस्त्र) च्या पलीकडील संख्या

सहस्त्र	शतक	दशक	एकक
1	0	0	0
1000			



आपण मोठ्या संख्या दर्शविण्यासाठी डाईन ब्लॉक ऐवजी टोकनचा वापर करूया











सहस्त्र	शतक	दशक	एकक
1	0	0	1
1001			
एक हजार एक			

1 सहस्त्र + 0 शतक + 0 दशक + 1 एकक = 1001

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

खालील कोष्टक पहा आणि रिकाम्या जागा भरा

टोकन	विस्तारित रूप	स.	श.	द.	ए.	संख्या	अक्षरी संख्या
	1000 + 1					1001	
						1002	
						1003	
		1	0	0	5		
							
	1000 + 100					1100	एक हजार एकशे
						1038	
							
							
	3000 + 0 + 10 + 9						

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

टोकन	विस्तारित रूप	स.	श.	द.	ए.	संख्या	अक्षरी संख्या
1000 100 100 10 1000 100 10 1000 10 100 100 1000 100 1 10 1000 1 1000 1 10 1 10 1 1							
1000 10 1000 10 10 1000 10 1000 10 10 1000 1000 1000 10 10 1000 1000 10 1000							

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

1) खाली दर्शविल्याप्रमाणे क्रमामध्ये पुढील व मागील संख्या लिहा.

a)




b)



c)




d)



चला खेळूया

बाजुला दाखविल्याप्रमाणे स्थानमूल्य सरकपट्टया तयार करा. सांगीतल्याप्रमाणे संख्या वाढविण्यासाठी किंवा कमी करण्यासाठी मुले पट्टया सरकवू शकतात.



a) 1895 – संख्या 1 ने वाढवा

b) 2785 – संख्या 10 ने वाढवा

c) 3369 – संख्या 2 ने कमी करा

d) 5648 – संख्या 10 ने कमी करा

e) 6487 – संख्या 20 ने वाढवा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

थोडा विचार करूया

1. 7 सहस्त्र, 0 शतक, 2 दशक, 4 एकक ही संख्या रामने 724 अशी लिहिली आहे.
   हे बरोबर आहे का ? .....
   चूक असल्यास तू बरोबर करून लिही .....

2 रीचाने 5 सहस्त्र, 6 शतक, 0 दशक, 3 एकक ही संख्या 563 अशी लिहिली आहे.
   हे बरोबर आहे का ? .....
   चूक असल्यास तू बरोबर करून लिहि .....


संख्यारेषा

1. खालीलपैकी कोणत्या संख्या 2226 आणि 3226 यांच्या मधे येतात? तुमच्या उत्तरांना गोल करा.

   3316 3236 2236 2216 3126 3216

2. सुचनेप्रमाणे करा.

   a) संख्यारेषेवर 1001 आणि 1038 या संख्या दर्शविलेल्या आहेत. तुम्ही 1043, 1069 आणि 1084 या संख्या दर्शविण्याचा प्रयत्न करा.



   b) खालील संख्या संख्यारेषेवर दर्शवा

   2025, 2080, 2175, 2245, 2295, 2310,2390–2430,2460.




   c) खालील संख्या संख्यारेषेवर दर्शवा.

   5512, 5548, 5590, 5636, 5673, 5695



   d) खालील संख्या संख्यारेषेवर दर्शवा.


   8679, 8990, 8923, 8763



@KTBS NOT TO BE REPUBLISHED

चला खेळूया

वेगवेगळ्या संख्या तयार करण्यासाठी पुस्तकात शेवटी दिलेली बाणाकृती कार्डे वापरा प्रत्येकाकडे एकेक कार्ड द्या आणि दिलेली संख्या तयार करण्यासाठी क्रमाने येऊन संख्या कार्डे मांडण्यास सांगा. तयार झालेली संख्या मोठ्याने वाचण्यास सांगा आणि विस्तारित रूपात व्यक्त करा.



प्रत्येक बाणाकृती कार्डांचे टोक एका सरळरेषेत येतील याची दक्षता घ्या.

3452 ही संख्या 3000, 400, 50 आणि 2 या कार्डांनी तयार झालेली आहे. म्हणून त्या संख्येचे विस्तारित रूप 3000+400+50+2 असे होईल.

3452 ही संख्या अक्षरी तीन हजार चारशेहे बावन्न अशी लिहितात.

4085 ही संख्या तयार करण्यासाठी कोणती कार्डे वापरावी लागतील ही संख्या विस्तारित रूपात आणि अक्षरात लिहा.


@KVBS NOT TO BE REPUBLISHED

मला शोधा ! संख्या मोठ्याने वाचा आणि खालील चौकटीत गोल करून दर्शवा

1	2	3	4	8	0	3	9
5	7	2	0	2	5	7	6
2	5	7	6	0	3	8	7
1	6	1	9	2	2	2	2
0	5	0	1	0	1	1	1
1	3	0	1	2	1	1	1
9	4	8	3	6	1	1	1

1. 3782 ही संख्या शोधा
2. दोन हजार पाच शेहे शहात्तर
3. सर्व अंक समान असलेली चार अंकी संख्या
4. या चौकटीमधील सर्वात लहान चार अंकी संख्या.
5. या चौकटीमधील सर्वात मोठी चार अंकी संख्या
6. 5000 पेक्षा मोठी आणि 5200 पेक्षा लहान असलेली संख्या.
7. 5600 आणि 6300 यांच्यामधील संख्या
8. फाशावर असलेल्या अंकांपासून तयार झालेली चार अंकी संख्या.

शिक्षकांसाठी सुचना : मुले योग्य कार्ड वापरतील आणि मांडणी करताना एकमेकावर येणारी टोकं योग्य क्रमाने येतील याची खात्री करा. त्यांनी कार्डे घेताना स्वतंत्र अंक असलेली कार्डे न घेता सहस्त्र, शतक, दशक आणि एकक असलेली कार्डेच घ्यावीत. भारतीय स्थानमूल्य पद्धतीमधील '0' चा वापर करणारा स्थान-धारक शिक्षकांनी काळजीपूर्वक हेरून ठेवावा.



चला, सोडवू या

1. एकक (1), दशक (10), शतक (100) आणि सहस्त्र (1000) चे टोकन वापरून संख्या ओळखा व आणि त्या खालील कोष्टकामध्ये लिहा-

   a) 6 दशक आणि 22 एकक

   b) 4 दशक आणि 12 एकक

   c) 3 शतक, 14 दशक आणि 8 एकक

   d) 12 शतक, 18 दशक आणि 2 एकक

   e) 1 सहस्त्र, 5 शतक, 10 दशक आणि 17 एकक



©KTBS NOT TO BE REPUBLISHED

	सहस्त्र	शतक	दशक	एकक	संख्या
a	0	0	8	2	82
b					
c					
d					
e					

2 A सर्वात मोठ्या संख्येला गोल करा

30 की 300

6000 की 600

6000 की 3000


2 B सर्वात लहान संख्येला गोल करा.

2 एकक की, 2 शतक

5 दशक की 2 सहस्त्र


7 दशक की 4 शतक

शिक्षकांसाठी सूचना: सर्व संख्या लिहिताना आपल्याला 0–9 असे दहा अंकच वापरावे लागतात हे मुलांच्या लक्षात आणून द्या. तसेच प्रथम सहस्त्र, नंतर शतक, त्या नंतर दशक आणि शेवटी एकक याच क्रमाने आपण संख्या लिहितो हे सुद्धा त्यांच्या लक्षात आणून द्या. (2A व 2B) ही उदाहरणे विद्यार्थ्यांनी स्थानांचे महत्त्व समजून घेण्यासाठी दिलेली आहेत. 2 शतक हे 2 दश□कापेक्षा नेह□मी मोठे असतात तसेच 2 शतक हे सुद्धा 9 दशकापेक्षा मोठे




संख्यांची तुलना :


गुरुद्वारामध्ये दर महिन्याला किती ताटे वापरली जातात याच्या नोंदी ठेवण्यासाठी जसप्रीत आणि गुलनाज मदत करत असतात. कोणत्या महिन्यात कमी-जास्त ताटे वापरली जातात यांची तुलना दर्शविण्यासाठी < आणि > ही संकेत कार्डे वापरा.




फेब्रुवारी : 1213




मार्च : 2121




सप्टेंबर : _____



ऑक्टोबर : _____



नोव्हेंबर : _____



डिसेंबर : _____

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

< आणि > ही संकेत चिन्हे वापरून तुलना करा.

3102 हे 3012 पेक्षा मोठे का आहे?

3012			
सहस्त्र	शतक	दशक	एकक
3	0	1	2

3102			
सहस्त्र	शतक	दशक	एकक
3	1	0	2

कोणती संख्या मोठी आहे ते तुम्ही कसे ओळखला?

स. श. द. ए. यापैकी कोणते स्थान तुम्हाला निर्णय घेण्यासाठी सहाय्यभूत ठरले?


चला करूया

1. < व > ही संकेतचिन्हे वापरून खालील संख्यांच्या जोड्यांची तुलना करा.

   र) 2190 ☐ 2910 ल) 7087 ☐ 7088

   ल) 1009 ☐ 9001 व) 982 ☐ 1024

2. खालील वस्तूंच्या किंमती लहानापासून मोठ्यापर्यंत (चढत्या क्रमात) मांडा.



₹ 1986



₹ 1099



₹ 1899

☐ < ☐ < ☐

3. खाली 200 एक दिवशीय आंतरराष्ट्रीय सामने खेळलेल्या काही महिला क्रिकेट खेळाडू आणि त्यांनी काढलेल्या धावांची यादी सुद्धा दिलेली आहे. त्यांनी काढलेल्या धावांची संख्या चढत्या क्रमाने मांडा. (लहान संख्येपासून मोठ्या संख्येपर्यंत)

@KTRS NOT TO BE REPUBLISHED

डेबी हॉकले	4064
सुझी बेट्स	5114
कॅरन रॉल्टन	4814
मिताली राज	7805
कार्लेट	6002

4. खालील पर्वतांच्या उंचीनुसार त्यांना उतरत्या क्रमात मांडा. (सर्वात जास्त उंचीपासून कमी उंचीपर्यंत)

पर्वत रांगा	उंची (मीटरमध्ये)
कांचन जंगा	8586
मूळळयन गीरी	1930
चौखंबा – I	7138
बैलाडिल रांग	1276
नंदादेवी	7816
K_2	8611
कळसूबाई	1646

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

5. <, =, व > हे संकेत वापरून खालील संख्यांची तुलना करा.

a) 2 दशक + 4 सहस्त्र +3 शतक ☐ 2043

b) 2 दशक + 4 सहस्त्र + 3 शतक ☐ 4320

c) 2 सहस्त्र + 9 शतक + 9 दशक + 9 एकक ☐ 3000

d) 15 एकक + 9 दशक + 3 शतक ☐ 1593

e) 5000+30+4 ☐ 5034

f) 5000+300+4 ☐ 5340

6. खालील संख्यांमधील मोकळ्या जागा 0–9 पर्यंतच्या अंकांनी अशारितीने भरा की दिलेल्या चिन्हांची तुलना योग्य होईल.

a) 7__3 < 768_ b) 853_<8_3_ c) _2_1< 5_2_

आव्हान!

700 व 800 वगळून त्यांच्या मध्ये एकूण 99 संख्या येतात. तर (7000 व 8000 यांच्या मध्ये एकूण किती संख्या येतील ते सांगा?

अचूक उत्तराला गोल करा.

900 999 1000

@KTDS NOT TO BE REPUBLISHED

चला शोध घेऊ

1. कोणत्याही अंकांची पुनरावृत्ती न करता 2,3,4,7 हे अंक वापरून शक्य तितक्या जास्त चार अंकी संख्या तयार करा. एकूण 24 संख्या तयार करणे शक्य आहे– तुम्ही शक्य तितक्या जास्त संख्या तयार करून त्या तुमच्या वहीत उतरत्या क्रमाने मांडा.

2. तुमच्या मित्रांनी तयार केलेल्या संख्यांशी तुलना करा आणि त्यांनी कोणकोणत्या वेगळ्या संख्या तयार केल्या आहेत ते पहा तुम्ही सर्वांनी मिळून शक्य असलेल्या सर्व 24 संख्या तयार केला आहात का ते पहा तुम्ही शक्य असलेल्या सर्व संख्या तयार केल्या आहेत हे तुम्हाला कसे समजेल ?

प्रकरण

5

विभाजन आणि मापन

W3R5N7



संपूर्ण आणि भाग


इकरा आणि तिची लहान बहिण सायना यांनी एक चित्र काढायचे ठरविले. इकरा त्यांच्याकडे असलेल्या पेपरचे समान दोन भाग करून अर्धा पेपर तिला देऊ इच्छिते, मात्र, सायना पेपरचा अर्ध्यापेक्षा मोठा भाग देण्याचा आग्रह करते. इकराने क्षणभर विचार केला आणि एक उपाय सुचविला.



तुला चित्र काढायला अर्धा पेपर पुरेल की, दोन चतकोर पेपर हवा आहे?

अर्धा पेपर म्हणजे थोडा लहान वाटतो पण
दोन चतकोर थोडा मोठा वाटतो, मला दोन चतकोर हवा.





@MTBS NOT TO BE REPUBLISHED

चला चर्चा करूया


1. तुम्ही पेपरचा कोणता भाग निवडला असता – एक अर्धा की, दोन चतकोर? का?
2. इकराने पेपरची समान वाटणी केली असे तुम्हाला वाटते का? कारण काय ? पेपर घेऊन तुम्ही प्रयत्न करा.

3. पेपरचे विभाजन समान झाले आहे हे तुम्हाला कसे समजले ?

4. सायना ने दोन चतकोर पेपरच का निवडला असेल ? तुम्हाला काय वाटते ?


चला, करून पाहू

1. सायनाने काही आकृत्यांचे दोन भागात विभाजन केले आहे. ज्या आकृत्यांचे समान दोन भाग पाडले आहेत त्यांना रंगवा. तुम्हाला याचे उत्तर कसे मिळाले ?



© KTBS NOT TO BE REPUBLISHED

2. खालील आकृत्यांमध्ये एक रेष मारून त्यांचे समान दोन भाग करा.






जेव्हा वस्तूचे समान दोन भाग केले जातात तेव्हा प्रत्येक भागाला अर्धा असे म्हणतात.

आपण अर्धा $\frac{1}{2}$ असे लिहितो.

3. खालील आकारांचे 4 समान भागात विभाजन करा.



जेव्हा वस्तूचे समान चार भाग केले जातात तेव्हा प्रत्येक भागाला चतकोर किंवा पाव असे म्हणतात.

आपण चतकोर $\frac{1}{4}$ असे लिहितो.




विचार करा : जर आपण वस्तूचे समान 5 भाग केले तर त्यातील प्रत्येक भाग अपूर्णांकात कसे लिहितात ?


@KTRS NOT TO BE REPUBLISHED

अर्धा आणि चतकोर करावयाचे अनेक मार्ग

चला, प्रयत्न करूया :

आयताकार कागदाचे समान दोन भाग करण्यासाठी तुम्हाला किती प्रकारे कागद घडी घालता येईल किंवा कापता येईल ? आयताकार कागद घेऊन तुम्ही प्रयत्न करा.






शिक्षकांसाठी सुचना : संकेतांकांचा वापर करून अपूर्णांक लिहिण्यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करा. ½ व ¼ अशा उदाहरणांच्या सहाय्याने सुरुवात करा.

कागदांच्या घड्या आणि आकृत्या यांच्या सहाय्याने मुलांना सरावासाठी भरपूर संधी द्या.

2. आयतामध्ये वेगवेगळ्या पाच प्रकारे समान चार भाग करता येतात ते खालील आयतात रेखाटून दाखवा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

3. खालील भाग त्यांच्या संबंधित पूर्णाकृतीशी जोडा.



टिंग–टाँग घंटा

सुमेधाच्या आईने स्वादिष्ट ढोकला बनवला आहे!





हा घ्या तुमचा ढोकला.
दोघांमध्ये समान वाटून घ्या.



ढोकल्याचे समान दोन भाग केले.
अर्धा मला आणि अर्धा विनायकसाठी,
हे एकदम बरोबर! याचा अर्थ 2 अर्धे
भाग मिळून एक पूर्ण ढोकला होतो.

टिंग–टाँग! अशी दरवाजावरची बेल वाजली





हॅलो कुमार !



पोरांनो, कुमारला पण ढोकला द्या



माझा वाटा, विनायकचा वाटा आणि
कुमारचा वाटा असा तिघांचा वाटा मिळून
एक पूर्ण ढोकला होईल.


@KTBS NOT TO BE REPUBLISHED

टिंग-टाँग ! सुमेधाची बहीण परिधी आली

ये, तू पण थोडा ढोकला खाऊन घे.



आता ढोकला 4 समान भागात विभागून जाईल. आम्हाला प्रत्येकाला एक चतकोर ढोकला मिळेल.




टिंग-टाँग! त्यांच्या शेजारची राधा आली घर आनंदाने एकदम गजबजले.

सुस्वागत राधा! थोडा ढोकला तू पण खाऊन घे



पून्हा विभागणी !!!
आता माझा ढोकला अजून थोडा कमी होणार मला माझ्या आवडत्या ढोकल्याचा फक्त $\frac{1}{5}$ भाग मिळेल.



©KTBS NOT TO BE REPUBLISHED



आता चर्चा करू


1. प्रत्येक जण येत होता तेव्हा सुमेधा कशाचे निरीक्षण करत होती ?
2. कोणत्या प्रसंगात सुमेधाला सर्वात जास्त ढोकला खायला मिळाला असता? – एक ढोकला 9 जणामध्ये विभागल्यास की 11 जणांमध्ये विभागल्यास ?
3. $\frac{1}{6}$ चे किती तुकडे घेतल्यास एक पूर्ण ठोकला तयार होईल?
4. राधा आणि विनायक या दोघांनीही आपला भाग सुमेधाला दिला तर तिचा एकूण वाटा किती होईल?

चला करून पाहू

1. ढोकला 6 जणांमध्ये समान विभागल्यास प्रत्येकाला किती ढोकला मिळेल? 8 जणांमध्ये विभागणी करण्याचा सुद्धा प्रयत्न करा. कोणाला ढोकल्याचा मोठा तुकडा मिळेल? आकृती काढून स्पष्ट करा.


©KTBS NOT TO BE REPUBLISHED

2. खाली दिलेल्या संख्येप्रमाणे ढोकल्याचे विभाजन केल्यास सुमेधाला मिळणारा भाग खालील आकृत्यांमध्ये रेखांकित करा. तसेच अपुर्णांक का लहान होत गेला त्याची चर्चा करा.




2 जणांना सुमेधाला मिळणारा भाग = $\frac{1}{2}$

अर्धा




3 जणांना सुमेधाला मिळणारा भाग = $\frac{1}{3}$


एक तृतीयांश




4 जणांना सुमेधाला मिळणारा भाग



5 जणांना सुमेधाला मिळणारा भाग



8 जणांना सुमेधाला मिळणारा भाग



9 जणांना सुमेधाला मिळणारा भाग

चला चर्चा करू

पुस्तकांच्या शेवटी दिलेला अपूर्णांक संच वापरून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

1. एक संपूर्ण वस्तू आणि तीचे वेगवेगळे भाग याबद्दल तुम्ही केलेल्या, निरीक्षणांबाबत चर्चा करा.
2. अपूर्णांक संचामधील कोणतेही दोन भाग वापरा आणि त्यांची तुलना करा. त्यापैकी कोणता भाग लहान आहे आणि का याबाबत चर्चा करा.
3. सुमेधाच्या असे लक्षात आले की, जेव्हा एक संपूर्ण वस्तू जास्तीत जास्त भागात विभागली जाते तेव्हा प्रत्येक भाग हा लहान होत जातो. तुम्ही सुमेधाच्या मताशी सहमत आहात का?
4. सुमेधा म्हणते, ''जेव्हा 1/5 चे पाच भाग मी एकत्र जुळवते तेव्हा एक पूर्ण ढोकला तयार होतो. तुमचा अपूर्णांक संच वापरून तुम्ही ही कृती करून पाहा
5. सुमेधा म्हणते की, एका संपूर्ण वस्तूचा हा एक तृतीयांश भाग आहे. ती असे का म्हणते आहे ?



शिक्षकांसाठी सुचना : एक वर्तुळाकार कागदाचा वापर करून ढोकळा विभाजनाची प्रक्रिया पुन्हा वर्गात स्पष्ट करून सांगा. आपण वस्तू ज्यावेळी अधिकाधिक लोकांना वाटत जाऊ त्यावेळी प्रत्येकाला मिळणारा वाटा कमी कमी होत जातो.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

आता आपण रिकाम्या जागा भरायचा प्रयत्न करूया. दोन्हीही अपूर्णांक हे एकाच पुर्णांकाचे भाग आहेत. आवश्यकता असल्यास तुमचा अपूर्णांक संच वापरा. आपले विचार मांडा,

1. ..... हा ..... पेक्षा मोठा आहे. ($\frac{1}{5}$, $\frac{1}{4}$)

2. ..... > ..... ($\frac{1}{9}$, $\frac{1}{6}$)

3. $\frac{1}{6}$ ..... $\frac{1}{8}$

4. ..... हा ..... पेक्षा लहान आहे.

माझी फुलबाग

राधाकडे 5 वेगवेगळ्या फुलझाडांच्या बिया आहेत गुलाब, मोगरा, लिली, झेंडू, आणि जाई. तीने त्या बिया आपल्या बागेत समान आकाराचे वाफे करून पेरायचे ठरविले आहे.



गुलाब मोगरा लिली झेंडू जाई

पण तिच्याकडे लिलीच्या अगदी थोडयाच बिया आहेत म्हणून तीने त्या दोन वाफ्यामध्ये गुलाबाच्या बिया लावल्या.

तीने नविन केलेली योजना दुसऱ्या आकृतीमध्ये दाखविलेली आहे तिच्या बागेचे चित्र पहा आणि खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.



NOT TO BE REPUBLISHED


बागेच्या $\frac{1}{5}$ किंवा एक पंचमांश भागात मोगरा लावला आहे.

बागेच्या ..... भागात झेंडूची फुले लावली आहेत.

बागेच्या ..... भागात जाईची फुले लावली आहेत.

बागेच्या $\frac{1}{5}$ आणि $\frac{1}{5}$ भागात म्हणजे एकूण $\frac{2}{5}$ भागात (दोन पंचमांश) गुलाब लावला आहे.

बागेचे चित्र पहा आणि उत्तरे लिहा.




मोगरा ..... भागात लावला आहे.

झेंडू ..... भागात लावला आहे.

गुलाब $\frac{1}{5} + \frac{1}{5} + \frac{1}{5}$ भागात म्हणजेच एकूण $\frac{3}{5}$ (तीन पंचमांश) भागात लावला आहे.

@KVBS NOT TO BE REPUBLISHED

बागेचे चित्र पहा आणि उत्तरे लिहा.



झेंडूची फुले ..... भागात लावलेली आहेत.


गुलाब $\frac{1}{5} + \frac{1}{5} + \frac{1}{5} + \frac{1}{5}$ अशा एकूण $\frac{4}{5}$ (चार पंचमांश) भागात लावला आहे

गुलाब $\frac{5}{5}$ भागात म्हणजेच बागेच्या संपूर्ण भागात लावला आहे.



चला करून पाहू

सात फुलांच्या बिया घेऊन बागेत समान आकाराचे वाफे तयार करा. – मोगरा, झेंडू, जाई, गुलाब, लिली, जास्वंदी आणि सदाफुली



गुलाब

(a) बागेच्या एक सप्तमांश ($\frac{1}{7}$) भागात मोगरा आणि तीन सप्तमांश ($\frac{3}{7}$) भागात गुलाब आणि जास्वंदी प्रत्येकी लावले.



मोगरा



लिली

(b) बागेच्या तीन सप्तमांश ($\frac{3}{7}$) भागात लिली, दोन सप्तमांश ($\frac{2}{7}$) भागात झेंडू आणि उरलेल्या दोन सप्तमांश ($\frac{2}{7}$) भागात सदाफुली लावली आहे.



झेंडू

(c) बागेच्या पाच-सप्तमांश ($\frac{5}{7}$) भागात मोगरा आणि दोन-सप्तमांश भागात ($\frac{2}{7}$) जास्वंदी लावली आहे.



मोगरा



सदाफुली

@KTES NOT TO BE REPUBLISHED

स्वादीष्ट दोसेवाला


करण वेगवेगळ्या प्रकारचे दोसे बनवितो. तो एकाच दोशावर वेगवेगळे पदार्थ वापरून ग्राहकाच्या आवडीनुसार वेगवेगळे नक्षिकाम करतो. ग्राहक नक्षिकामासाठी खालील पदार्थांच्या यादीतील पदार्थ निवडू शकतो.

1. सुबक बटाटा
2. मसालेदार कांदा
3. मिरची पनीर
4. तिखट टोमॅटो

करणला हे खास दोसे बनविण्यास मदत करा.




दोशाचा स्वाद	दोशाच भाग
सुबक बटाटा	$\frac{1}{4}$
मसालेदार कांदा	$\frac{1}{4}$
मिरची पनीर	$\frac{1}{4}$
तिखट टोमॅटो	$\frac{1}{4}$



@KTBS NOT TO BE REPUBLISHED


तुम्ही स्वतः करा

खालील दोशांच्या विविध पदार्थांशी संबंधित भागाला अपूर्णांकात दर्शवा.



1) मिरची पनीर =


2) सुबक बटाटा =



1) तिखट टोमॅटो =


2) सुबक पोटॅटो =

3) तिखट कांदा =



1) मसालेदार कांदा=

2) तिखट टोमॅटो =



1) तिखट टोमॅटो=

2) सुबक बटाटा=

3) मसालेदार कांदा =

आता तुम्ही सुद्धा मागणीनुसार वेगवेगळे दोसे बनवू शकता.


$\frac{2}{3}$ भाग मसालेदार कांदा आणि $\frac{1}{3}$ भाग सुबक बटाटा वापरून दोसा बनवा.

$\frac{3}{8}$ भाग सुबक बटाटा, $\frac{1}{8}$ भाग मिरची पनीर आणि $\frac{4}{8}$ भाग तिखट टोमॅटो वापरून दोसा बनवा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

चला शोध घेऊ

मीनाकडे 8 दिवे आहेत. त्यापैकी $\frac{1}{4}$ दिवे लाल रंगाने रंगवा. $\frac{1}{4}$ दिवे शोधण्यासाठी दिव्यांचे एकूण 4 समान भाग करा. 8 दिव्यांचे समान 4 भाग कसे करायचे ते पाहू शकता का?




आता 2 दिवे लाल रंगाने रंगवा.

चला करून पाहू

आता आपण खाली दिलेल्या प्रसंगामधील अपूर्णांकांचा शोध घेऊ. दिलेल्या चित्रांमध्ये योग्य भागांना गोल करा.

1. खालील चित्रात 12 बिस्कीटे दिलेली आहेत. मुलांची संख्या जर खालीलप्रमाणे असेल तर त्यांना मिळणाऱ्या भागांसाठी कोणता अपूर्णांक येईल.



a) 3 मुले

b) 6 मुले

c) 2 मुले

d) 4 मुले

2. सिमरनने आपल्या शाळेतील मैत्रीणींना तीच्या वाढदिवसाला बोलवले आहे. त्यामधील $\frac{1}{3}$ मैत्रिणींना भेट म्हणून हेअर बँड मिळाला. खालील चित्रामधील $\frac{1}{3}$ मैत्रिणींच्या डोक्यावर हेअर बँड खूणेने दाखवा.





3. खाली दिलेल्या कुंड्यांपैकी $\frac{1}{5}$ कुंड्यांमध्ये फुलझाडे काढा.



© KTBS NOT TO BE REPUBLISHED

आपल्या सभोवतालच्या अपूर्णांकांचा शोध घेऊ.

केतकी आपल्या दैनंदिन जीवनात आपण अपूर्णांकांचा वापर कोठे करतो ते जाणून घेण्यासाठी उत्सुक आहे. तीला खालील प्रमाणे काही उदाहरणे सापडली. तीला अजून काही उदाहरणे शोधण्यास मदत करा आणि ते तुमच्या वहीत चित्रे काढून दर्शवा.

1. काल आईने बर्फीच्या  बॉक्सचे समान चार भाग करण्यास सांगीतले. बॉक्समध्ये 16 बर्फ्या होत्या. 16 बर्फ्या रेखाकृतीने दाखवा आणि त्यामधील $\frac{1}{4}$ बर्फ्या रेखांकीत करा. प्रत्येक भागामध्ये किती बर्फ्या असतील?

2. रोहनकडे त्याची वही सजविण्यासाठी एक रिबन होती. मोहनकडे रोहनच्या रिबनच्या लांबीच्या $\frac{1}{4}$ लांबीची रिबन होती. मग रोहनच्या रिबनची लांबी किती असेल? रेखाचित्राने दाखवा.

   मोहनकडील रिबन

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

तुम्ही स्वतः प्रयत्न करून पहा


तुमच्या सभोवतालचे निरीक्षण करा आणि कोणत्या संदर्भात आपण अपूर्णांक वापरू शकतो ते पहा. खाली दिलेल्या जागेत त्यापैकी कोणतेही दोन संदर्भ लिहा.

1. _____
   _____
   _____


2. _____
   _____
   _____

चला करून पाहू


1 एक आयताकार कागद घ्या आणि त्याला तीन समान भाग होतील अशा घड्या घाला. नंतर त्या घड्या उलगडा.




2 चित्रात दाखविल्याप्रमाणे तीन समान भागापैकी एक भाग रंगवा




3 आता पूर्वीप्रमाणे कागद तीन समान भागात घडी घाला आणि पुन्हा दोन समान भागात घडी करा. आणि पून्हा उलगडा.




4 आता रंगवलेल्या भागाचे निरीक्षण करा. आता रंगीत भागासाठी कोणता अपूर्णांक येईल? याचा अर्थ काय?



5 त्या कागदाचे पुन्हा समान भाग होतील अशी आणखी एक घडी घाला व उलगडून पहा. रंगविलेल्या भागातील बदलाचे अवलोकन करा.



6 प्रत्येक घडीनंतर तयार झालेल्या भागांसाठी अपूर्णांक लिहा.



$\frac{1}{3} = \frac{2}{6} =$ ..... $=$ ..... $=$ .....

@KVBS NOT TO BE REPUBLISHED


चला प्रयत्न करून पाहू

आणखी एक कागद घ्या आणि तीच कृती पुन्हा करा. यावेळी दोन समान भाग करा आणि प्रत्येकवेळी असेच करत चला. तुम्हाला काय समजले ते तुमच्या वर्गमित्रांना सांगा.

$\frac{1}{2}$ = $\frac{1}{4}$ = ... = ... = ...

थोडी चर्चा करूया

खाली दिलेला अपूर्णांकांचा तक्ता पहा आणि खालील प्रश्नावर चर्चा करा. उत्तरे शोधण्यासाठी तुमचा अपूर्णांक संच सुद्धा तुम्ही वापरू शकता.




1. किती $\frac{1}{4}$ हे $\frac{1}{2}$ शी समान आहेत?
2. $\frac{2}{3}$ हे $\frac{1}{2}$ पेक्षा लहान आहेत की मोठे?
3. $\frac{1}{10}$ चे 10 तुकडे हे एक संपूर्ण पट्टी इतके आहे. हे विधान सत्य आहे का?
4. $\frac{1}{6}$ चे तीन तुकडे हे $\frac{1}{8}$ च्या दोन तुकड्यांशी समान आहेत. हे विधान सत्य आहे का?
5. $\frac{1}{4}$ शी समान होण्यासाठी $\frac{1}{8}$ चे किती तुकडे घ्यावे लागतील?
6. अशा प्रकारे एक मोठा तुकडा मिळविण्यासाठी आणखी कोणते तुकडे एकत्र मिळवावे लागतील ते शोधून काढा.


© KTBS NOT TO BE REPUBLISHED

चला करून पाहू

1. बबलू चौरसाकार घेऊन खेळत आहे. त्याला ते चौरस अशारितीने कापायचे आहेत की त्यांचा प्रत्येक तुकडा समान असेल. ज्या चौरसांचे समान भाग झालेले आहेत त्यांना गोल करा. ज्या ठिकाणी शक्य आहे त्या ठिकाणी रेखांकीत केलेला भाग अपूर्णांकात लिहा.




2. खालील आकृत्यांमधील रेखांकित केलेला भाग काही मुलांनी अपूर्णांकात सांगीतलेला आहे. त्यांचे अपूर्णांक बरोबर आहेत का ते तपासा. जे बरोबर आहेत त्यांना गोल करा व जे चुकिचे आहेत त्यांना X या चिन्हाने दर्शवा. दर्शविलेले भाग समान करण्यासाठी तुम्ही त्यामध्ये आणखी रेषा काढू शकता. तुमचे विचार मांडा व चर्चा करा.




©KTBS NOT TO BE REPUBLISHED

अमिना म्हणाली : $\frac{1}{3}$	पेरी म्हणते : $\frac{1}{6}$	बाळू म्हणाला : $\frac{1}{5}$
किशोर म्हणाला: $\frac{1}{4}$	कुंज म्हणाला: $\frac{1}{3}$	गीता म्हणाली : $\frac{1}{4}$


3. दिलेल्या चित्रांमधील रंगविलेला भाग दर्शविण्यासाठी अपूर्णांक ओळखा.



4. खाली दिलेल्या चित्रांमधील निळ्या रंगाने रंगविलेल्या भागासाठी अपूर्णांक ओळखा.



5. खालील आकृत्यांचे समान भाग करा व दिलेला अपूर्णांक दर्शविणारा भाग रेखांकित करा.



$\frac{2}{3}$ रेखांकित करा	$\frac{4}{6}$ रेखांकित करा	$\frac{1}{4}$ रेखांकित करा $\frac{1}{8}$ सुद्धा तुम्ही दर्शवू शकाल का?	$\frac{3}{4}$ रेखांकित करा

@KTBS NOT TO BE REPUBLISHED


प्रकरण 6

लांबीचे मापन

S9T4G8



चला निरीक्षण करूया



@KTB NOT TO BE REPUBLISHED

1. चित्र पहा. चित्रातील मुले काय करत आहेत. चित्रात मोजणाऱ्या प्रसंगाना (✓) अशी खुण करा

a) लांबी ☐ c) वजन ☐ e) रूंदी ☐

b) उंची ☐ d) खोली ☐ f) तपमान ☐

2. उंची मोजण्यास कोणते साधन वापरतात? आपण उंची मोजण्यासाठी आणखी कोणती साधने वापरू शकतो?

3. लांबी मीटरमध्ये मोजतात. हे तुम्ही मागील इयत्तेत शिकला आहात. पूर्वज्ञान वापरून तुमच्या वर्गाशी संबंधीत खालील विधाने बरोबर कि चूक आहेत ते तपासा व रिकाम्या जागा भरा.

a) माझ्या वर्गातील जास्तीत जास्त मुलांची उंची एक मीटर पेक्षा जास्त आहे .....

b) माझ्या हाताची लांबी एक मीटरपेक्षा कमी आहे .....

c) वर्गखोलीच्या दरवाजाची उंची एक मीटरपेक्षा कमी आहे .....

d) फळ्याची रूंदी एक मीटरपेक्षा जास्त आहे .....

शिक्षकांसाठी सुचना : उंच, रुंद, आखुड आणि लांब हे शब्द दैनंदिन जीवनात वापरले जातात. विद्यार्थ्यांशी चर्चा करा की लांबी, रुंदी, उंची व खोली हे सर्व लांबीच्या मोजमापाचा संदर्भ देतात हे शब्द वेगवेगळ्या परिस्थिती आणि संदर्भानुसार वापरले जातात. या टप्यावर विद्यार्थ्यांना फक्त हे समजुन घेणे आवश्यक आहे की हे सर्व शब्द लांबी दर्शवतात.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED


मोजणे मजेदार आहे

आम्ही बनवलेले लक्षात ठेवा.

1 मीटर (मी),

अर्धा मीटर ($\frac{1}{2}$ मी), आणि

एक चतुर्थांश मीटर ($\frac{1}{4}$ मी) दोरी. चला त्या पुन्हा बनवूया.



1 मी = $\frac{1}{2}$ मी + $\frac{1}{2}$ मी आणि 1 मी = $\frac{1}{4}$ मी + $\frac{1}{4}$ मी + $\frac{1}{4}$ मी + मी आणि $\frac{1}{2}$ मी = $\frac{1}{4}$ मी + $\frac{1}{4}$ मी

हे तुमच्या लक्षात आले का?

चला करूया


खालील कृती करण्यासाठी दोऱ्यांचा वापर करा. गरज भासल्यास दोऱ्याचे संयोजन करून वापरा.

1. 1 मी, 5 मी, आणि 10 मी रेषांवर चला, उडी मारत जा आणि रांगत जा.

तुमच्या वर्गखोलीच्या जमिनीवर किंवा मैदानात, 1m, 5m आणि 10m लांबीची रेषा काढा. तुम्ही या रेषा कशा बनवाल? विचार करा. आणि तुमच्या मित्रांशी चर्चा करा. त्या रेषावर चालत जा, उड्या मारा आणि रांगत जा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

शिक्षकांसाठी सुचना : वारंवार मीटर लांबीच्या दोरीचा वापर करुन रेषा बनविणे आणि त्या रेषांवर चालणे, उड्या मारणे आणि रांगणे या कृतीमुळे विद्यार्थ्यांना 5m व 10 m हे अंतर किती लांब आहे. याचा अंदाज लावण्यास मदत होईल या अनुभवाच्या आधारे ते सभोवतालच्या लांबीचा अंदाज घेऊ शकतील व तुलना करू शकतील.



2. लांब उडी.


प्रत्येक मुल लांब उडीच्या स्पर्धेत भाग घेऊ शकतो. तुमच्या मित्रांनी किती लांब उडी मारली आहे? दोरीचा योग्य वापर करून शक्य तितके अचूक अंतर मोजा. सर्वात लांब उंडी कोणी मारली?

सर्वात कमी उडी कोणी मारली?

खालील कोष्टक भरा.

विद्यार्थ्यांचे नांव	उडीची लांबी (अंदाजे)			प्रत्यक्ष मापन
	1m पेक्षा कमी	1m	1m पेक्षा जास्त	


३. तुमच्या वर्गखोलीची लांबी व रुंदी किती आहे. अंदाज करा. मोजमाप करा आणि तपासा.




शिक्षकांसाठी सुचना : विद्यार्थ्यांना त्यांच्या पावलांचा वापर करून 100 m अंतर मोजण्याची संधी द्या आणि 100 m मध्ये किती पावले बसतात. ते नोंदवा. हा अनुभव पुढील अंदाज बांधण्यासाठी वापरता येईल.


@KTBS NOT TO BE REPUBLISHED

विचार करुया : लांबीचा अंदाज करूया.




लांबी सुमारे 80 m











लांबी सुमारे 6 m.

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

वरील चित्रे काळजीपूर्वक पहा आणि खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

1. एका बसची लांबी किती मीटर आहे ? एका क्रिकेट बॅटची लांबी किती मीटर आहे ?
2. दोन निळ्या व्हेल माशांच्या लांबीइतक्या किती बसेस असतील ?
3. एका व्हेल माशाची लांबी मोजण्यासाठी किती क्रिकेर बॅट्ची आवश्यक्ता असेल ?
4. जर दोन शहामृग एकमेकांवर उभे राहिले तर त्यांची उंची ..... च्या उंचीइतकी असेल ?
5. एका निळ्या व्हेल माशाच्या लांबी इतकी लांबी होण्यासाठी किती मगर घ्यावे लागतील ?

लहान वस्तू मोजणे. (Measuring Small Things)

खोडरबर किंवा तांदळाच्या दाण्यासारखी लहान वस्तू कशी मोजायची याचा तुम्ही विचार करू शकता का ?



अशा लहान वस्तू मोजण्यासाठी आपल्याला एक लहान एककाची आवश्यकता असते. एका प्रमाणित मीटरपट्टीचे निरीक्षण करा. मोजपट्टीवर तुम्हाला 100 समान भागात विभागलेली दिसेल.



या प्रत्येक भागाच्या लांबीला **सेंटीमीटर (cm)** हे विशेष नांव दिलेले आहे.



चला निरीक्षण करूया.


चुटकीला तिच्या रोपाच्या उंचीत वाढ झाल्याचा मागोवा ठेवायचा आहे.




शिंपी वापरतो ती मापन टेप आणि एक मीटर दोरीची तुलना करा. दोन्हींची लांबी सारखीच आहे का वेगवेगळी ?



खालील मापनटेपचे काळजीपूर्वक निरीक्षण करा. तुम्हाला काय लक्षात येते ?



या खुणा आपल्याला अचुकपणे : मोजण्यासाठी कशा मदत करतात. यावर चर्चा करा.



प्रत्येक लाल पट्टीची लांबी 1cm आहे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

10 cm करण्यासाठी लाल पट्टी 10 वेळा पुनरावृत केली जाते. जेंव्हा आपण लाल पट्टीची लांबी 100 वेळा पुनरावृत करतो, तेंव्हा आपल्याला 1 मीटर / टेप मिळेल.


1 मीटर (m) = 100 सेंटीमीटर (cm)

$\frac{1}{2}$ मीटर (m) = ... cm, $\frac{1}{4}$ m = ... cm

आता तुमची रोपे आठवड्याला किती उंच वाढतात. ते पाहण्यासाठी मोजटेप / स्केलचा वापर करा.

चला करूया


1. प्रत्येक वस्तूचे मोजमाप मोजपट्टी / स्केल वापरून करा.




_____ cm



_____ cm



_____ cm



_____ cm

वस्तूंची नावे लांबीच्या चढत्या क्रमाने लिहा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

2. खालील वस्तुंच्या लांबीचा अंदाज घ्या आणि तुमची उत्तरे तुमच्या वर्गातील इतर मित्रांच्या उत्तरांशी तुलना करा. 1 cm लांबी पेक्षा कमी किंवा 1cm लांबीशी समान असणाऱ्या वस्तुंची काही उदाहरणे लिहा व मोजमाप करून पडताळणी करा.

वस्तुंची लांबी→ वस्तूंची नावे↓	1 cm इतकी	1 cm पेक्षा जास्त	1 cm पेक्षा कमी	वास्तविक/प्रत्यक्ष मोजमाप
एक नख				
खोडरबर				
एक मुंगी				
गहु				
राजमाचे बीज				


3. खेळण्यांतील तीन कारगाड्या घेऊन त्या वितरण (रॅम्प) वरून सोडा आणि प्रत्येक कारगाडी किमी अंतर जाऊ शकते ते शोधा व लिहा.
तुम्ही लाकडी वितरण (रॅम्प) वापर करू शकता. किंवा तुमच्याकडे असलेल्या कोणत्याही साहित्याचा वापर करून वितरण बनवू शकतात.

कार	उतरणापासून अंतर	क्रमांक
कार – 1	_____ cm	
कार – 2	_____ cm	
कार – 3	_____ cm	

शिक्षकांसाठी सुचना : विद्यार्थ्यांना निरीक्षण करण्यासाठी एक मीटर मोजपट्टी किंवा मोजमापाची टेप आणा. टेपवरील खुणा आणि त्यावर लिहिलेले अंक विद्यार्थ्यांना निरीक्षण करण्यास सांगा. टेपवरील 100 ही संख्या काय दर्शवते यावर चर्चा करा. टेपवरील खुणांची संख्या यावर चर्चा करा. विद्यार्थी अनेकदा दोन खुणांमधील अंतर एक सेंटीमीटर (1ला) आहे असे गृहीत धरतात. एक मीटर म्हणजे 100 सें मी हे स्पष्ट करा. अशा निरीक्षणानंतर मुले लहान लांबी मोजण्यासाठी मोजपट्टी/मोजमापाचा टेप वापरु शकतात

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

4. खालील खजिना शोध खेळात सर्वात लांब आणि सर्वात लहान मार्ग शोधा. तुम्ही अडथळ्यांभोवती फिरु शकता., पण त्यांच्यावरून उडी मारू शकत नाही. तुम्ही फक्त पिवळ्या फरशांवरून चालू शकता. गवतावर चालता येणार नाही. तुमच्या मार्गाची लांबी सेंटीमीटरमध्ये शोधू शकता का ? नकाशातील 1 cm या सुचनेकडे लक्ष द्या.



5. एका कागदावर तुमच्या हाताचा ठसा उमटवा व मोजपट्टीच्या सहाय्याने मोजा.




माझ्या हाताच्या ठस्याची लांबी = ... cm

6. कोणत्याही वस्तुचे मोजमाप काढण्यासाठी तुमच्या हाताचा वापर करा. ते सेंटीमीटरमध्ये रूपांतर करा व मोजपट्टी वापरून खात्री करा.

वस्तू	हातांची संख्या	हात वापरून अंदाजे मोजमाप	सें मी मोजपट्टीने प्रत्यक्ष मोजमाप
1. पाठ्यपुस्तकाची लांबी		——— सें मी	——— सें मी
2. खुर्चीची उंची		——— सें मी	——— सें मी
3. डेस्कची रुंदी		——— सें मी	——— सें मी
4. फुलदाणीची उंची		——— सें मी	——— सें मी


@KTBS NOT TO BE REPUBLISHED

7. अश्विनीची मोजपट्टी मोडलेली आहे. खालील मोडलेल्या मोजपट्टीचा वापर करून तिला मोजमाप करण्यास मदत करू शकता का ?






_____ cm




_____ cm

8. खाली दिलेल्या संख्या रेषेवर योग्य ठिकाणी रिकाम्या जागा भरा.



9. फलकाची लांबी 2 मीटर आहे. सोनूकडे 20 सें मी लांबीची सजावटी स्टिकर आहे. फलकाच्या सर्व कडा सजविण्यासाठी सोनूला 20 सें मी लांबीच्या किती सजावट स्टिकर लागतील ?



मीटर आणि सेंटीमीटर (Metre and Centimeters)

रामु आणि शामु आपली उंची मोजण्यासाठी टेप वापरत आहेत.


रामु टेपवरून आपली उंची 120 सें मी अशी वाचतो आणि शामु तीच उंची 1 मी 20 सें मी अशी वाचतो.



@KTBS NOT TO BE REPUBLISHED

कोण बरोबर आहे ?

पिंकी म्हणते की दोघेही बरोबर आहेत आणि खालील चित्र काढते.



चला करूया

1. गावच्या सरपंचानी दोन वेगवेगळ्या व्यक्तींकडून त्यांच्या गावातील काही विहिरींची खोली मोजून घेतली.

   a) खोली समान होईल अशा प्रकारे रिकाम्या जागा भरा.

   i. 2 मी = 200 सें मी

   ii. ..... मी = 400 सें मी

   iii. 6 मी = ... सें मी

   iv. ..... मी = 800 मी

   b) समान खोली असलेल्या विहिरी ओळखा आणि जोड्या जुळवा.

1 मी 40 सें मी	550 सें मी
4 मी 60 सें मी	140 सें मी
2 मी 30 सें मी	460 सें मी
5 मी 50 सें मी	230 सें मी

NOT TO BE REPUBLISHED @KVBS

चला शोधुया

उपक्रम :– विद्यार्थी मोजमापाचा टेप वापरुन आपली उंची मोजतील. वहीत एक कोष्टक तयार करा आणि तो पूर्ण करा.

विद्यार्थ्यांचे नाव	उंची (सें मी मध्ये)	उंची (मी. मध्ये)

खालील रिकाम्या जागा भरा.

1. सर्वात उंच विद्यार्थ्यांची उंची ..... आहे.
2. सर्वात ठेंगण्या विद्यार्थ्यांची उंची ..... आहे.
3. 1 मीटरपेक्षा जास्त उंची असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या ..... आहे.
4. 1मीटरपेक्षा कमी उंची असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या ..... आहे.

© CTBS NOT TO BE REPUBLISHED

कुंपण आणि कडा घालणे.

भोला आपल्या भाजीपाला बागेभोवती विटांचे कुंपण बनवत आहे. कुंपणावरच्या विटाना रंग भरा. अपूर्ण कुंपण पूर्ण करण्यासाठी त्याला किती विटांची गरज लागेल.

एखाद्या वस्तूच्या किंवा आकृतीच्या सीमेच्या एकूण लांबीला परिमिती म्हणतात.




शिक्षकांसाठी सुचना : परिमिती म्हणजे बंद आकाराच्या सीमारेषेची लांबी असते. हे विद्यार्थ्यांना समजावून सांगा. ही लांबी, पावले, अंगठ्याचे ठसे, ठसे उमटवून ब्लॉक छपाई अशा विविध अनौपचारिक एककांनी मोजता येते. अशी मोजमापे साधारण अंदाजे असतात. मात्र मोजपट्टी किंवा मोजमापाचा टेप यासारख्या औपचारिक एककांचा वापर केल्यास मोजमाप अधिक अचूक होते.


चला करूया

1. भोलाने आपल्या बागेभोवती खालील पध्दतीने कुंपण केले आहे.

   सर्वात लांब असलेल्या कुंपण पध्दतीला गोल करा.



2. बिंदू चौकट वापरून काही आकारांची परिमिती शोधूया एक उदाहरण तुमच्यासाठी करून दाखवले आहे.



a) सर्वात जास्त परिमिती असलेल्या आकृतीला निळ्या रंगाने रंगवा.


b) सर्वात कमी परिमिती असलेल्या आकृतीला हिरव्या रंगाने रंगवा.

c) समान परिमिती असलेल्या आकृतीला (✓) अशी खूण करा.

© KSBS NOT TO BE REPUBLISHED


शिक्षकांसाठी सुचना : परिमिती म्हणजे एखाद्या आकाराभोवतीची एकूण लांबी किंवा अंतर आहे. हे विद्यार्थ्यांना समजावून सांगा, 1 सें मी च्या बिंदू जाळीमुळे परिमिती कशी मोजता येते हे त्यांना समजून घ्यायला मदत करा

3. खालील आकारांपैकी कोणकोणात्या आकारांची परिमिती सारखी आहे? त्यांना (✓) अशी खुण करा.



@KTBS NOT TO BE REPUBLISHED

4. कमित कमी परिमिती असलेल्या बागे खाली (✓) अशी खूण करा.




5. तुमच्या आजुबाजुच्या आकारांची परिमितींचा अंदाज करा व नंतर प्रत्यक्ष मोजपट्टीने मोजा व खाली दिलेल्या जागेत लिहा.

अ.नं.	वस्तू	अंदाजे परिमिती सें.मी. मध्ये	प्रत्यक्ष परिमिती सें. मी. मध्ये
1.	डेस्क		
2.	फलक		
3.	वर्गखोलीच्या जमिनीची परिमिती		
4.			
5.			
6.			

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

6. 20 सें मी परिमिती असलेले तीन वेगवेगळे आकार काढा.



प्रकरण
7

एक स्वच्छ गाव


Y8W6Y4



माझ्या शाळेची सहल

डेझी आणि लकी शिलाँग, मेघालय येथे इयता 4 थी मध्ये शिकतात. शाळेने सहलीसाठी खालील पोस्टर वितरीत केले आहे.

शालेय सहल 30 डिसेंबर- 2025



मॉली नाँगचं का?
''माव-ली - नाँग''

- आशियातील सर्वात स्वच्छ गाव
- देवाची बाग
- पर्यावरणपूरक जीवनशैली

प्रमुख आकर्षणे

- जिंगमहम झाडाच्या मुळांचा साकव (पूल)
- एपिफनीचे चर्च
- मॉलीनाँग धबधबा

स्थान: पूर्व खासी हिल्स NH-206, शिलॉंगपासून 79 कि.मी

लोकसंख्या :- खासी जमातीची 77 कुटुंब, लोकसंख्या 414


उपक्रम:-निसर्ग सौंदर्य पाहणे समृध्द संस्कृती आणि प्रेक्षणियस्थळ

वाहतुक :- शाळेची बस शाळेतुन सुटण्याची वेळ = 7am
शाळेत पोहचण्याची वेळ = 4 pm

आजच नोंदणी करा !
प्रति विद्यार्थी ₹ 500
संपर्क: मिस् रिटा
येताना गरम पाणी बॉटल व जेवण घेऊन या.

© MAHARASHTRA STATE BOARD OF TEXTBOOK PRODUCTION AND CURRICULUM RESEARCH PUBLISHED

डेझी आणि लकी खरेदीस जातात



डेझी आणि लकी आपल्या सहलीबद्दल खूप उत्सुक आहेत सहलीसाठी लागणाऱ्या वस्तू खरेदी करण्यासाठी ते त्यांच्या आईसोबत आठवड्याच्या बाजारात जातात. कुटुंबाने खरेदी करावयाच्या वस्तुंची यादी केली आहे.

- फळे आणि भाज्या
- सहलीसाठी लागणाऱ्या वस्तू – बिस्किटे, पाण्याच्या बाटल्या आणि सुकामेवा

सपान दादांकडे फळे आणि भाज्या विकण्यासाठी एक हातगाडी आहे. खाली फळे आणि भाज्यांचे दरपत्रक दिले आहे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

	प्रति किलोग्रॅमची किंमत
सीताफळ	₹ 45
बीन्स	₹ 95
मुळा	₹ 23
कांदा	₹ 32
बटाटा	₹ 37
सुरण	₹ 45
चिकू	₹ 70
पपई	₹ 65
केळी	₹ 55

सपान दादा डेझी आणि लकी यांना वेगवेगळ्या प्रमाणात फळे व भाज्यांचा खर्च शोधायला सांगतात. कामे पूर्ण करण्यासाठी त्यांना मदत करा.

गणनेसाठी संख्या रेषा, खेळण्यातील पैसे किंवा इतर कोणतीही पध्दत वापरू शकता.

2 kg बीन्स

_____

1 kg सिताफळ आणि 1 kg चिकू

_____

1 kg कांदे आणि 1 kg बटाटे

_____

1 kg मुळा आणि 1 kg सुरण

_____

2 kg कांदा आणि 2 kg पपई

_____

2 kg कांदे आणि 2 kg बटाटे

_____

या दोन किंमतींबाबत तुला काय वाटतं?

आई ₹ 130 मध्ये वस्तू खरेदी करते. तिने काय खरेदी केले असावे? एकापेक्षा जास्त शक्यता आहेत.

_____

_____

₹ 163

@KTBS NOT TO BE REPUBLISHED



उदया दीदी तांदूळ, पीठ, डाळी आणि मसाले विकण्याचे दुकान चालविते. आई किराणा साहित्य खरेदी करत असताना, डेझी आणि लकी उदया दीदीना ग्राहकांना उरलेली रक्कम परत देण्यास मदत करतात. उदया दीदी त्यांना काही तार्किक प्रश्नही विचारतात.

पुढील उदाहरणांमधील रिकाम्या चौकटीतील रक्कम शोधण्यास मदत करा. संख्या रेषा खेळण्यातील पैसे किंवा इतर कोणताही मार्ग वापरा.

किंमत	₹113
दिलेली रक्कम	₹150
शिल्लक रक्कम	₹37

किंमत	₹185
दिलेली रक्कम	₹200
शिल्लक रक्कम	

किंमत	
दिलेली रक्कम	₹200
शिल्लक रक्कम	0

किंमत	₹435
दिलेली रक्कम	₹500
शिल्लक रक्कम	

किंमत	₹149
दिलेली रक्कम	₹500
शिल्लक रक्कम	

किंमत	₹46
दिलेली रक्कम	
शिल्लक रक्कम	

किंमत	
दिलेली रक्कम	₹200
शिल्लक रक्कम	₹75

किंमत	₹580
दिलेली रक्कम	
शिल्लक रक्कम	₹120

किंमत	
दिलेली रक्कम	
शिल्लक रक्कम	



लकी आणि डेझी मित्रांसोबत खाण्यासाठी 3kg केळी खरेदी करतात. केळी खरेदी करण्यासाठी ते कोणता अचूक पर्याय निवडू शकतात.

ⓐ 

ⓑ 

ⓒ 

ⓓ 


ⓔ 

शिक्षकांसाठी सुचना : विद्यार्थ्यांना त्याच्या पध्दतीने विचार करून चर्चा करण्यास प्रोत्साहित करा. वरील उदाहरणे सोडविण्यासाठी लवचिक पध्दती वापरण्यास विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करा.



© KTBS NOT TO BE REPUBLISHED

एक मजेशीर कोडे



फिरायला गेलेली चार खोडकर मुले एका ताज्या संत्र्यांच्या बागेजवळ येतात. ते शेतकऱ्याला एका संत्र्याची किंमत विचारतात. ''प्रत्येक संत्रे ₹21 ला आहे''. असे शेतकरी म्हणतो. तेंव्हा ते चार मित्र प्रत्येकी दोन संत्री विकत घेतात. शेतकऱ्याला पैसे देण्यासाठी सर्वजण जॅकेटच्या खिशात हात घालतात.

प्रत्येकजण वेगवेगळी नोट देतो. कृष्णा ₹50 ची, सुदामा ₹100 ची, माला ₹200 ची आणि नीला ₹500 ची नोट देते.

शेतकऱ्याकडून प्रत्येकाला किती शिल्लक रक्कम मिळेल?

कृष्णा
दिलेली रक्कम : ₹.....
शिल्लक रक्कम : ₹.....

सुदामा
दिलेली रक्कम : ₹.....
शिल्लक रक्कम : ₹.....

माला
दिलेली रक्कम : ₹.....
शिल्लक रक्कम : ₹.....


नीला
दिलेली रक्कम : ₹.....
शिल्लक रक्कम : ₹.....

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

चला खेळूया


1 ते 6 पर्यंतचे अंक पुनरावर्तीत न करता रिकाम्या वतुर्ळात अशा प्रकारे भरा की त्रिकोणाच्या प्रत्येक बाजूवरील बेरीज 9 येईल.

1 2 3 4



1 ते 6 हे अंक वापरून त्रिकोणाच्या प्रत्येक बाजुची बेरीज 10 येईल अशी मोडणी करा.

1	2	3
4	5	6



या 6 अंकाचा वापर करून आणखी कोणकोणत्या बेरजा करता येतील?

प्रत्येक बाजूची बेरीज 12 करता येईल का? बेरीज 13 करता येईल का?

अंकांची मांडणी करण्यासाठी तुम्ही कोणती पध्दत वापरली?

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

बेरीज करा

डेझी आणि लकी दुसऱ्या दिवशी सकाळी बसने सहलीसाठी मॉलीनाँग गावाला जाणार आहेत. त्यांच्या शाळेतुन 24 शिक्षक आणि 438 मुले जात आहेत. शेजारील शाळेतुन 476 मुले 28 शिक्षकही त्याच ठिकाणी जात आहेत.




मुलांसोबत एकूण किती शिक्षक जात आहेत?

24 + 28

शिक्षकांच्या संख्येचा अंदाज करा.

_____




मुलांसोबत एकूण 52 शिक्षक जात आहेत.

शिक्षकांसाठी सुचना : शिल्लक, एकूण, कमी, अधिक असे शब्द शाब्दीक समस्या सोडविण्यासाठी पुरेसे नसतात. त्या ऐवजी मुलांना प्रश्न समजावुन घेण्यासाठी चित्रे काढावयास सुचित करावे. यासंबंधी शाब्दीक समस्या सोडविताना लागणारी चित्रे किंवा सूचना पुस्तकाच्या शेवटी दिलेली आहेत.

© MSCERT NOT TO BE REPUBLISHED


सहलीसाठी किती मुले जात आहेत?

सहलीला जाणाऱ्या मुलांच्या संख्येचा अंदाज करा.



मॉलीनाँगला 914 मुले जात आहेत.

शिक्षकांसाठी सुचना : विद्यार्थ्यांना मुर्त साधनापासुन अमूर्त संकल्पनापर्यत पोहचण्यास सहाय्य करा. येथे दाखविलेल्या पायऱ्यामध्ये असलेले सहसंबंध ओळखणे हे मुलांसाठी चांगलेच असेल प्रत्येक वेळी 10 एकक हे 1 दशक आणि 10 दशक हे 1 शतक त्याच प्रमाणे 10 शतक हे 1 सहस्त्र असे पुनर्गटीत केले आहे. याठिकाणी ''हातचा'' या शब्दा ऐवजी ''पुनर्गठन हा शब्द वापरलेला आहे. विद्यार्थ्याची उत्तरे तपासण्यासाठी संख्या रेषेचा किंवा मागील इयत्तेतील (स्कीप काऊंट)पध्दतीची समान अंतर असलेली संख्या वापर करण्यास प्रोत्साहित करा किवा मागील इयत्तेत वापरलेली पद्धत वापरा विद्यार्थीना पुनर्गठन करण्याचा सराव होईपर्यंत 2 अंकी संख्यावरील क्रियांचा सराव सातत्याने करा.



डेझी आणि लकी यांनी पुसॉचा (एक खाद्य पदार्थ) ₹38 चा एक मोठा तुकडा खाल्ला त्यांना तो खुप आवडला आणि आणखी एक ₹16 चा लहान तुकडा खरेदी केला तर त्यांनी पुसॉ खाद्यपदार्थ खरेदी करण्यासाठी किती रुपये खर्च केले ?

38 + 16=

त्यांनी खर्च केलेल्या पैशांचा अंदाज घ्या.....

38 → 10 10 10 | 1 1 | 1 1 | 1 1 | 1 1

\+ 16 → 10 | 1 1 | 1 1 | 1 1


= _____ दशक + _____ एकक

	दशक	एकक
	◯	
	☐	☐
\+	☐	☐
	☐	☐ = ☐ ☐

त्यांनी ₹ ..... खर्च केले.

वर दिलेल्या चौकटींमध्ये पुनर्गठन करून अंतिम उत्तर लिहा.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS



पुसॉ (Pusaw) हा भारताच्या ईशान्य भागातील खासी प्रदेशातील पारंपारिक खाद्यपदार्थ आहे. तो खासी टेकड्यांमधील डोंगराळ भागात आणि भात शेतात पिकवलेल्या लाल तांदळाच्या जातीपासुन बनलेला असतो. मॅव रँगलाँग हे गाव पुसॉ खाद्यपदार्थासाठी प्रसिध्द आहे.

शिक्षकांसाठी सुचना : मुलांना हळुहळु डाईन्स ब्लॉकऐवजी टोकन वापरण्यास प्रोत्साहित करा. त्यांच्या पायऱ्यांमधील साम्य मुलांच्या लक्षात आणून द्या.




डेझी आणि लकी यांनी आपल्या पिगी बँकमध्ये ₹185 जमा केले होते. त्यांच्या आईने त्यांना सहलीसाठी आणखी ₹125 दिले. सहलीसाठी त्यांनी एकूण किती पैसे घेतले?

त्यांनी सहलीसाठी घेतलेल्या पैशांचा अंदाज करा .....

NOT TO BE @KFES REPUBLISHED

185




____ शतक + ____ दशक + ____ एकक

= ____ शतक + ____ दशक + ____ एकक

\+

125



	शतक	दशक	एकक
\+			
=			

डेझी आणि लकी यांनी सहलीसाठी ₹ ..... घेतले

वरील चौकटींमध्ये पुनर्गठन करून अंतिम उत्तर लिहा.

चला करूया



1. कलाक्षितिज ही सादरीकरण कलेची शाळा आहे. खाली दिलेल्या तक्त्यात गायण व तबला शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या आहे. अंदाज करा आणि एकूण विद्यार्थ्यांची संख्या शोधा.

	तबला वादक	गायक	एकूण
मुले	78	532	..... मुले
मुली	95	346	..... मुली
एकूण	..... तबला वादक	..... गायक	

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

संगीत शाळेत आणखी 15 मुली दाखल झाल्या व त्यांना तबला शिकायचा आहे आता किती मुली तबला वाजवतात?

2. खालील संख्यांची तुमच्या वहीत स्थानमूल्य तक्त्यात मांडणी करून बेरीज करा.

a) 32+47 b) 654+95 c) 286+123

d) 476+324 e) 700+289 f) 534+483

3. प्रितीच्या शाळेत 423 मुले आहेत. तिच्या चुलत बहिणीच्या शाळेत तिच्या शाळेपेक्षा 178 मुले कमी आहेत. तर प्रितीच्या चुलत बहिणीच्या शाळेत किती मुले शिकतात?


वजाबाकी करा

प्रवासादरम्यान न्याहरीसाठी बस थांबली. 83 मुलांनी पुसॉ व 46 मुलांनी फळांची प्लेट घेतली.

फरकाचा अंदाज करा .....

पुसॉ घेणारी मुले फळांची प्लेट घेणाऱ्या मुलांपेक्षा कितीने जास्त आहे?

पुसॉ घेणारी मुले आणि फळांची प्लेट घेणारी मुले यातील फरक = 83–46



	दशक	एकक
	7	13
	8	3
−	4	6
	3	7


फळांची प्लेट खरेदी करणाऱ्या मुलांपेक्षा पुसॉ खरेदी करणाऱ्या मुलाची संख्या 37 ने जास्त आहे

प्रतिक्षेत असलेल्या मुलांच्या संख्येचा अंदाज करा.....

सर्व 438 मुलांनी मॉलीनाँग गावातील प्रसिद्ध ''लिव्हिंग रुट्स् ब्रिज पहायला जाण्याचा निर्णय घेतात. प्रथम 215 मुले लिव्हिंग रूटस् ब्रिज पहायला जातात. लिव्हिंग रुटस् ब्रिज पाहण्यासाठी किती मुले प्रतिक्षेत आहेत?

@KTRS NOT TO BE REPUBLISHED

ब्रिज पाहण्यासाठी प्रतिक्षेत असलेल्या मुलांची संख्या = 438−215



श	द	ए
4	3	8
2	1	5
2	2	3


2 श + 2 द + 3 ए = 223 ⟶

223 मुले ब्रिज पाहण्यासाठी प्रतिक्षेत आहेत.

लकी आणि डेझी यांनी सहलीसाठी एकूण ₹310 आणले होते. अन्न आणि काही भेटवस्तू खरेदीसाठी खर्च केल्यानंतर त्यांच्याकडे ₹179 रुपये शिल्लक राहिले तर आतापर्यंत त्यांनी किती पैसे खर्च केले आहेत?

अंदाजे उत्तर .....

खर्च केलेले रुपये = 310−179




श	द	ए
2	10	10
3	1	0
1	7	9
1	3	1

1 श + 3 द + 1ए = 131 ⟶

म्हणून त्यांनी ₹131 खर्च केले आहेत.

© NCERT NOT TO BE REPUBLISHED

शिक्षकांसाठी सुचना : वजाबाकीची उदाहरणे सोडविताना विद्यार्थी प्रथम ठोस वस्तूंचा वापर करु शकतात. उदाहरण सोडविताना आपण प्रथम एकक स्थानापासून सुरुवात करून नंतर दशक, शतक आणि याप्रमाणे पुढे सरकतो. वजाबाकी करताना जेव्हा एकक स्थानामध्ये पुरसे अंक नसतात. तेंव्हा एक दशकाचे दहा एककामध्ये पुन्हा गट करण्याची आपल्याला गरज भासते. अशाच प्रकारे जेव्हा दशक स्थानात पुरेसे अंक नसतात तेंव्हा आपण एक शतकाचे दहा दशकात आपण गट करतो.




चला सोडवूया

राम काकांना मागील वर्षी आपल्या आंब्याच्या झाडाचे 264 आंबे मिळाले. या वर्षी त्यांना 527 आंबे मिळाले. या वर्षी त्यांना मागील वर्षापेक्षा किती जास्त आंबे मिळाले ?

अंदाजे उत्तर

.....

गरज भासल्यास वरील उदाहरणासाठी टोकन्स्चा वापर करा किंवा चित्र काढा.



© KTBS NOT TO BE REPUBLISHED


4. बाहुल्यांच्या सणासाठी (दसऱ्यातील गोब्बे हब्ब) रंगण्णाने 639 बाहुल्या बनविल्या त्यापैकी त्याने 531 बाहुल्या विकल्या तर त्याच्याजवळ किती बाहुल्या शिल्लक राहिल्या.

अंदाजे उत्तर

.....

शिल्लक बाहुल्यांची संख्या .....

गरज भासल्यास वरील उदाहरणासाठी टोकन्सचा वापर करा किंवा चित्र काढा.



5. खालील संख्यांची तुमच्या वहीमध्ये स्थानमूल्य तक्त्यात मांडणी करून वजाबाकी करा.

a) 83−23 d) 803−350

b) 345−123 c) 900−328




e) 763−437

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

चला सोडवूया

1. वाकांडा गावातील सार्वजनिक वाचनालयात खालील पुस्तके आहेत. मुले सुट्टीत वाचण्यासाठी ती पुस्तके घेतात.

पुस्तकाचे नांव	पुस्तकातील पाने
 स्वामी आणि मित्र	179
 पंचतंत्र कथा	236

	कराडी टेल्स	30
	अकबर – बिरबल	96
	ब्लु अम्ब्रेला	90
	फेलुदाच्या साहसकथा	128


a) रमाने उन्हाळ्याच्या सुट्टीत पचंतंत्र कथा हे पुस्तक वाचले. केशुने अकबर बिरबल, कराटी टेल्स् आणि ब्लू अंब्रेला ही पुस्तके वाचली. तुमच्या मते कोणी अधिक वाचन केले? किती पाने जास्त वाचली?

b) सुमीने फेलुदाच्या साहसकथा पुस्तकातील 23 पाने वाचली आहेत. पुस्तक पूर्ण करण्यासाठी आणखी किती पाने वाचायची शिल्लक आहेत?

c) जग्गुने सुट्टीत येथे यादी केलेली सर्व पुस्तके वाचायचे ठरविले. त्यांने चार आठवड्यात स्वामी आणि मित्र, अकबर बिरबल आणि फेलुदाच्या साहसकथा मधील 50 पाने वाचून पूर्ण केली आहेत. सर्व पुस्तके पूर्ण वाचण्यासाठी त्याला आणखी किती पाने वाचावी लागतील?

2. दिल्ली आणि अलीगड दरम्यान रोज धावणारी एक रेल्वेगाडी 131 कि. मी अंतर प्रवास करते. खाली दिलेले चित्र पहा आणि प्रश्नांची उत्तरे लिहा.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED



a) दादरी येथुन सुटताना ट्रेनमध्ये किती प्रवासी होते? .....

b) अलीगड येथे ट्रेनमधून उत्तरलेल्या लोकांची संख्या किती ? .....

c) ट्रेनमध्ये नवी दिल्ली येथे जास्त लोक होते की अलिगड येथे? किती जास्त / किती कमी? .....

d) ट्रेनने एकूण किती लोकांनी प्रवास केला? .....

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

चला सोडवूया

a)

	श	द	ए
	4	5	2
+		8	9

b)

	श	द	ए
	6	4	1
–	2	7	3

c) इयता 3 री मध्ये शिकलेल्या काही युक्त्यां आठवा व पटकन सोडवा.

326+25 = ...

675+5= .....

410−12 = ...

204−10= .....



मी असा विचार करु शकतो. 410−10=400
400 पेक्षा 2 ने कमी म्हणजे 398

811+99 = ...

945−19 = ...

d) खालील संख्यांची स्थानमूल्य तक्त्यात मांडणी करुन सोडवा.

1. 38 +943
2. 465+ 305
3. 435 +462
4. 764−657
5. 518 −209
6. 879−53

e) अशा दोन संख्या शोधा की, ज्यांची बेरीज 856 होईल तसेच अशा आणखी दोन संख्या शोधा की ज्याच्यातील फरक 563 असेल.

या संख्याचा वापर करून तुम्ही स्वतः लेखी उदाहरणे तयार करा.



856 = ☐ + ☐



563 = ☐ − ☐

@KTES NOT TO BE REPUBLISHED

संख्या जोडी शोधा (Number Pair Hunt)

खाली संख्यांची एक चौकट (Grid) दिलेली आहे. या जाळीत अनेक संख्या जोड्या आहेत. संख्या जोडी या अशा दोन संख्या आहेत ज्या उभ्या किंवा आडव्या रेषेत लागून येणाऱ्या संख्या आहेत.

उदाहरणार्थ:- 111 आणि 185, तसेच 48 आणि 185 या दिलेल्या चौकटीतील संख्या जोड्या आहेत.

सर्वात मोठी बेरीज किंवा वजाबाकी कोणाची आहे. हे शोधण्यासाठी आपल्याला प्रत्येक संख्या जोडी तपासावी लागेल का?

35	100	179	68
111	185	143	54
300	48	225	190
54	321	63	167

या संख्या चौकटीत एकूण किती संख्या जोड्या आहेत?

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

1) ज्यांची बेरीज सर्वात जास्त आहे अशी संख्या जोडी शोधा.

.....

2) ज्यांची बेरीज सर्वात कमी आहे अशी संख्या जोडी शोधा.

.....

3) ज्यांची वजाबाकी सर्वात जास्त आहे अशी संख्या जोडी शोधा.

.....

4) ज्यांची वजाबाकी सर्वात कमी आहे अशी संख्या जोडी शोधा.

.....

रिकाम्या चौकटीत योग्य अंक लिहा.

खाली दिलेली बेरीज व वजाबाकी बरोबर होण्यासाठी रिकाम्या चौकटीत अचूक अंक लिहा.

		6		1			3		2
+	1		+	2		+		8	8
	5	0		3	8		8	9	0
	7			6	5		4	7	
−	4		−			−	1	4	
	2	7		2	5			2	7

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

चला करूया.

1. बेरीज करा.

a) 23+489	d) 35+99	g) 580+207
b) 105+295	e) 409+387	h) 338+666
c) 630+56	f) 67+76	i) 826 +268

2. वजाबाकी करा.

a) 300-45	d) 842-387	g) 403-245
b) 962-268	e) 674-76	h) 600-384
c) 706-209	f) 754-409	i) 546-538


शिक्षकांसाठी

बॉक्स आकृती (Box Diagrams) विद्यार्थ्यांना शब्दसमस्या समजुन घेण्यास तसेच त्या सोडविण्यासाठी योग्य उपाय शोधण्यास मदत करतात. खालील उदाहरणे बेरीज आणि वजाबाकीवरील सर्व शब्दसमस्यांसाठी साधारणपणे लागू पडतात. कोणत्या चौकटी भरलेल्या आहेत. यावरून कोणती क्रिया करायची हे ठरवता येते. समस्याचे तीन प्रकार आहेत – एकत्र करणे. तुलना करणे आणि बदल. प्रत्येक समस्या थोड्याफार वेगळ्या बॉक्स आकृतीद्वारे मांडता येते, ज्यामुळे समस्या पूर्णपणे समजते.

उदाहरण 1:– एकत्र करणे (Combine) दोन वेगवेगळ्या गटांचा / संचाचा समावेश होतो.

उदा: एका शाळेत प्राथमिक स्तरात 343 मुले आणि माध्यमिक स्तरात 532 मुले आहेत. या दोन स्तरांमध्ये एकूण किती मुले आहेत?

343 + 532 = ?




उदाहरण 2: बदल अस्तित्वात असलेल्या संघात / संख्येत बदल होतो

उदा: माझ्या पिग्गी बँकेत 445 रुपये होते. तीन महिन्यानंतर माझ्याकडे 800 रूपये झाले. तीन महिन्यात रक्कम कितीने वाढली?

445 + ? = 800

800 – 445 = ?




उदाहरण 3:– बदल (change)

सोहमच्या दुकानात काही बटाटे होते. त्याने आणखी 150 कि. ग्रॅ. बटाटे विकत घेतले आणि आता त्याच्याकडे एकूण 500 कि.ग्रॅ बटाटे आहेत. सुरुवातीला त्याच्याकडे किती कि. ग्रॅ. बटाटे होते.

? + 150 = 500

500 – 150 = ?




उदाहरण 4:– तुलना (Compare)

दोन प्रमाणांची तुलना करणे

उदा. अनु ही तिची बहीण मिनीपेक्षा 6 वर्षांनी मोठी आहे. अनु सध्या 8 वर्षाची आहे, तर मिनीचे वय किती?


8=?+6




@KTBS NOT TO BE REPUBLISHED

व्दिमितीय आकार

टीप: प्रकरण 1 मध्ये दिलेले आकार वापरा.



डाईन्स ब्लॉक्स्



@KTBS
NOT TO BE REPUBLISHED


टीप:– आवश्यकता असल्यास अधिक डाईन्स ब्लॉक्स् तयार करा.

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED


त्रिकोणाकृती लोलक आणि आयतकार लोलक/घनायतांच्या जालाकृत्या

टीप : ठिपक्यांच्या रेषांवरून कापा आणि गडद रेषांवर घडी करा.

त्रिकोणी लोलक




@KTBS
NOT TO BE REPUBLISHED



आयतकार लोलक / घनायत


@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

अपूर्णांकांचा संच



@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

CM मोजपट्टी



@KTBS
NOT TO BE REPUBLISHED